**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004 MAHARASHTRA**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004 महाराष्ट्र
PHONE : EPABX : 2609000
FAX No : 0091 – 0231 – 2690655, 2692333, 2691533
ए.आर. परीक्षा विभाग 2609486

जा. क्र/शिवाजी वि./परीक्षा/डी. वाय. आर. ऑन/5795 दि. 26/02/2016

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक
संलग्नित महाविद्यालये आणि मान्यता प्राप्त परिसंस्था

विषय – 1) अंतर्गत/सत्रकर्म/प्रात्यक्षिक/गुणांची डाटा एंट्रीसाठी प्रणाली उपलब्ध करुन देणेबाबत.

महोदय/महोदया,

आपणांस कळविण्यात येते की, मार्च/एप्रिल 2016 मध्ये होणा–या भाग 1 सत्र I/ II चे परीक्षांचे संपूर्ण कामकाज विद्यापीठ पोर्टलवर होणार आहेत व इतर सर्व सेमि 3/4/5/6 निकालासह सर्व कामकाज डियु पोर्टलवरुन होणार आहे. या अनुषंगांने खालील बाबींचे काटेकोर पणे पालन करणे आवश्यक आहे.

**अ) अंतर्गत/सत्रकर्म(टर्मवर्क)/प्रात्यक्षिक/ गुणांची डाटा एंट्री :**

१. ज्या अभ्यासक्रमांना अंतर्गत/सत्रकर्म(टर्मवर्क)/प्रात्यक्षिक गुण आहेत अशा परीक्षांचे अंतर्गत/सत्रकर्म/प्रात्यक्षिक गुण भरण्यासाठी डियु पोर्टलवर प्रणालीद्वारे सुविधा करुन देण्यात आली आहे. डियु पोर्टलवर प्रणालीद्वारे हे गुण भरणे आवश्यक आहे. दुरशिक्षण प्रणाली मधील विद्यार्थ्यांचे सदरचे गुण संबधित अभ्यासकेंद्रांनी (स्टडी सेंटर्स) भरावयाचे आहेत.

२. सदर प्रणाली 28 मार्च 2016 पासून ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात येईल महाविद्यालयातील संबधितानी अंतर्गत/सत्रकर्म/प्रात्यक्षिक चे गुण ऑनलाईन पध्द्तीने 10 एप्रिल 2016 अखेर बिनचूकतेने भरणेचे असून त्याची छापील प्रत संबंधीत विषय शिक्षक/परीक्षक यांच्या सहीने प्रमाणित करुन त्या त्या परीक्षा विभागात दि. 16 एप्रिल 2016 पुर्वी किंवा पर्यंत पाठविणे आवश्यक आहे. गुण ऑन लाईनच भरणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी. सी. डी. पाठवू नयेत. दूरशिक्षण प्रणालीच्या विद्यार्थ्यांबाबत सदरची प्रत दुरशिक्षण केंद्राच्या संबंधित समन्वयकांकडे जमा करावयाची आहेत.

३. निर्धारित तारखेनंतर आलेले गुण कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. अशा सुचना सर्व संबंधितांना देण्यात याव्यात. गुण भरण्याची ऑनलाईन सुविधा निर्धारित तारखेस बंद झाल्यानंतर ती पुन:श्च उपलब्ध करुन देण्यात येणार नाही. याबाबत सूचना संबधितांना द्याव्यात.

कृपया वरील माहिती सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून त्याप्रमाणे कार्यवाही करवून घ्यावी व परीक्षा आणि निकालाचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

Sd/-

(श्री. महेश काकडे)
परीक्षा नियंत्रक

प्रत :—

1 संचालक / उपकुलसचिव दुरशिक्षणकेंद्र

2 सर्व विभाग प्रमुख व उपकुलसचिव / सहा. कुलसचिव.

3 डी. यु. डी. सी. / संगणक आय. टी. विभाग

यांना माहितीसाठी पुढील कार्यवाहीसाठी.

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004 MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004 महाराष्ट्र
PHONE : EPABX : 2609000
FAX No : 0091 – 0231 – 2690655, 2692333, 2691533
ए.आर. परीक्षा विभाग 2609486

संदर्भ क्र. शिवाजी वि./परीक्षा/ऑन डी वाय आर/5796 दि. 26/02/2016

प्रति,

प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यता प्राप्त परिसंस्था
शिवाजी विघापीठ,

विषय – 15 मार्च 2016 पासून सुरु होत असलेल्या (उन्हाळी सत्रातील) परीक्षांबाबत...

महोदय,

आपणांस विदित आहेच की, 15 मार्च 2016 पासून सुरु होणा–या विविध परीक्षांसाठी सर्व संबंधीत महाविद्यालयांनी विदयार्थ्यांचे परीक्षा अर्ज सादर केलेले आहेत सर्व पात्र विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज संगणकीय प्रणालीतूनच भरले जावेत याकरीता विद्यापीठामध्ये महाविद्यालयनिहाय शिबिराचे आयोजन केलेले होते. तथापी काही विद्यार्थ्यांच्या बाबतीत निकालामधील त्रुटी किंवा अन्य अपूर्ण बाबींमुळे मार्च/एप्रिल 2016 च्या निकालामध्ये काहीही अपूर्णता राहू नये व संपूर्ण निकाल निर्दोष असावेत त्या दृष्टीने उपाय योजना करण्यासाठी सर्व महाविद्यालयकरिता दि. 28/1/2016 व 29/1/2016 या दोन दिवशी तीन जिल्हयांत प्रशिक्षण कार्यशाळा आयोजीत केली होती. त्या दरम्यान उपरोक्त बाबी संबंधी स्पष्ट सुचना ही दिलेल्या आहेत. त्याअनुषंगाने परीक्षा अचूक व निर्दोष होण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे सूचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

1) महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, काही विद्यार्थ्यांचे निकाल तांत्रिक कारणास्तव अथवा परीक्षा प्रमाद विलंबाने जाहीर झाले असतील तसेच काही परीक्षांचे निकाल उशिरा झाले असतील अशा विद्यार्थ्यांकरीता निकाल जाहीर झाल्यापासून सात दिवसात परीक्षा अर्ज भरुन महाविद्यालयात सादर करणेचा आहे. याबाबतचे परीक्षा शुल्क विनाविलंब स्विकारावे व महाविद्यालयाने अर्ज तातडीने विद्यापीठात सादर करावा.

2) महाविद्यालयाच्या लॉगीन मध्ये उपलब्ध असणारे (रेग्युलर व दूरशिक्षण अभ्यासक्रमामध्ये) समरी रिपोर्ट तपासावेत. त्यामध्ये काही त्रुटी/अपूर्णता/कमतरता असल्यास त्या तात्काळ विद्यापीठ विभागाशी संपर्क साधून दुरुस्त कराव्यात. कारण महाविद्यालयांना पाठविण्यात येणा–या प्रश्नपत्रिका समरी रिपोर्ट नुसारच व रेग्युलर तसेच दूरशिक्षण माध्यमासाठी एकाच पाकिटातून प्रश्न प्रत्रिका पाठविण्यात येतात. या परीक्षा सत्रापासून कोणत्याही कारणास्त्व ई–मेल द्वारे प्रश्नपत्रिका पाठविण्यात येणार नाहीत.

3) काही विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज काही कारणाने उशिरा जनरेट झाले असतील तर ते तपासून तात्काळ इनवर्ड करण्याची कार्यवाही करावी. अर्ज इनवर्ड न झाल्यास त्या विद्यार्थ्यांचा डेटा कॅप सेंटरवरती मार्कस भरणेकरीता उपलब्ध होत नाही. त्यामुळे त्याचा निकाल राखीव ठेवला जातो.

4) तसेच सर्व विद्यार्थ्यांना बैठक क्रमांक मिळाले असल्याची खात्री करावी काही तांत्रिक अडचणीमुळे बैठक क्रमांक मिळाला नसल्यास विद्यापीठ विभागाशी संपर्क साधावा. परस्पर कोणतेही ऑड नंबर देवून विद्यार्थ्यास परीक्षेस बसवू नये किंवा मागणी करु नये. असे घडल्यास विद्यार्थ्यांच्या निकालाकरिता विद्यापीठ प्रशासन जबाबदार राहणार नाही.

5) आपल्या महाविद्यालयातील टिचींग प्रोव्हिजननुसार सर्व विषयाची माहिती समरी रिपोर्टमध्ये आली असल्याची खात्री करावी.

6) ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा प्रमाद समितीने विषयास/ संपूर्ण परीक्षेस बसण्यासाठी प्रतिबंध केले आहेत अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज ही महाविद्यालयांनी मॅन्युअल भरल्याचे निदर्शनास आलेले आहेत. अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा अर्जाबाबत कोणतीही प्रक्रिया करण्यात आलेली नाही. जे विद्यार्थी काही कालावधीसाठी प्रतिबंधीत आहेत. त्यांचे परीक्षा अर्ज जनरेट/भरले जाणार नाहीत. त्या विद्यार्थ्यांना परीक्षेस बसून देण्याबाबतची कार्यवाही खातरजमा करुनच करावी. याबाबतची माहिती विद्यार्थ्यांना तात्काळ देण्यात यावी.

7) आपल्या महाविघालयामध्ये नियमित व दूरशिक्षण माध्यमातील कोणकोणत्या परीक्षेसाठी व कोणकोणत्या विषयासाठी विघार्थी प्रविष्ठ होणार आहेत याची माहिती महाविघालयाने विचारात घेवून विघापीठाकडून प्रश्नपत्रिका प्राप्त झाल्या आहेत काय याची तपासणी करावी. त्यामध्ये कोणत्या विषयाच्या प्रश्नप्रत्रिका प्राप्त झाल्या नसतील तर तसे परीक्षेपुर्वी किमान तीन दिवस अगोदर विघापीठाच्या प्रश्नपत्रिका वितरण विभागास ई–मेल द्वारे कळवावे. (strongroom@unishivaji.ac.in)

**8) दूरशिक्षण पध्दतीने परीक्षा देणा–या विद्यार्थ्यांची समरी ही स्वतंत्रपणे तयार होत असल्याने आपल्या महाविद्यालयाचा युजर आयडी व पासवर्ड वापरुन सदरची समरी नियमित विद्यार्थी समरी प्रमाणे घ्यावी व त्याप्रमाणे परीक्षांचे नियोजन करावे.**

आपला विश्वासू,

Sd/-

परीक्षा नियंत्रक

प्रत माहितीसाठी – 1) बी. ए./बी. कॉम./बी. एस्सी. परीक्षा विभाग
2) परीक्षक नियुक्ती विभाग
3) प्रश्नप्रत्रिका वितरण विभाग